# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# नाशिक विभागीय मंडळ, नाशिक.

**अत्यंत महत्वाचे**

क्रमांक : नाविमं/संकीर्ण १५३०
दिनांक : 25/९/२००३

प्रति,
14.335
मुख्याध्यापक / ~~प्राचार्य~~,
~~नाशिक~~ / धुळे / ~~नंदुरबार / जळगांव~~

विषय : प्रचलित शाळा क्रमांक व कनिष्ठ महाविद्यालय क्रमाक बदलण्याबावत...
संदर्भ : राज्य मंडळाचे पत्र क्रमांक रा.मं/संगणकयंत्र/१९२३०३/४३६६ दिनांक १४/७/२००३

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, बऱ्याच वेळा शासन स्तरावंर वेगवेगळ्या कामाकरिता तालुकानिहाय शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची माहिती आवश्यक असते. परंतु सध्याच्या प्रचलित शाळा व कनिष्ठ महाविद्यायांच्या यायांवरून सदर माहिती तातडीने काढणे शक्य होत नाही. तसेच शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची वाढती संख्या विचारात घेता सध्याच्या सांकेतिक क्रमांकाची पुनर्रचना करणे ही गरजेचे झाले आहे. या सर्व बार्बीचा विचार करून राज्य मंडळाच्या आदेशानुसार सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या मंडळाने दिलेल्या सांकेतिक क्रमांकाची पुनर्रचना तालुका निहाय व महानगरपालिका क्षेत्र निहाय करण्यात आली आहे. त्यानुसार आपल्या शाळेस / कनिष्ठ महाविद्यालयास सध्या असलेला सांकेतिक क्रमांक रद्द करून खालील प्रमाणे नविन सांकेतिक क्रमांक देण्यात आला आहे.

| सध्या असलेला सांकेतिक क्रमांक | पुनर्रचना करून दिलेला नविन सांकेतिक क्रमांक |
|---|---|
| 14.335 | S-14.01.084 |

शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या नविन सांकेतिक क्रमांकात सुरवातीचे दोन अंक जिल्ह्याचा क्रमांक, त्यापुढील दोन अंक तालुक्याचा क्रमांक व त्यापुढील तीन अंक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय क्रमांक दर्शवितात.

वरील प्रमाणे नाविन सांकेतिकक्रमांकाची नोंद घ्यावी. हा बदल फेब्रु / मार्च २००४ च्या परीक्षेपासून अंमलात आणावयाचा आहे. त्यामुळे आपण फेब्रु / मार्च २००४ च्या परीक्षेसाठी नियमित विद्यार्थ्यांची जी आवेदनपत्रे (ऑक्टोवर २००३ महिन्यात) मंडळास सादर करणार आहात. त्या आवेदनपत्रात या नविन सांकेतिक क्रमांकाची नोंद अचूक -रित्या करावी.

नविन सांकेतिक क्रमांकाची अंमलबजावणी फेब्रु / मार्च २००४ च्या परीक्षेपासून करावयाची असल्याने ऑक्टोवर २००३ व त्या पूर्वीच्या परीक्षेच्या संदर्भातील सर्व पत्र व्यवहारासाठी सध्या असलेला (जुना) सांकेतिक क्रमांकच नमुद करणे आवश्यक आहे याचीही कृपया नोंद घ्यावी.

नव्याने शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या याद्या (नांव व पत्यासह) छपाई करून घ्यावयाच्या असल्याने शाळेच्या व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सध्या असलेल्या पत्यात (संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, तालुका, पिनकोड इ.) काही बदल असल्यास तसे त्वरित या कार्यालयास कळावावे.

(सही)

विभागीय सचिव,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक.

**प्रति माहितीसाठी,**

१. शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नाशिक/धुळे / नंदुरबार / जळगांव.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक – ४२२ ००१.
–x–x–x–x–x–x–x–x–x–x–x–x–x–x–x–x–x–x–

2103
क्रमांक/नाविमं/संकिर्ण/माध्य/मान्यता/
नाशिक – ४२२ ००१.
दिनांक – २५/८/२००७

प्रति,
मुख्याध्यापक,
श्री छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय,
शिवभूमी, आसाणे (पु.नंर)
ता. जि. धुळे

विषय :- विभागीय मंडळाची प्रथम मान्यता प्रदान करणेबाबत...

शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग नाशिक यांनी त्यांचे पत्र क्रमांक 4238/86 दिनांक 29/8/2007 अन्वये आपल्या विद्यालयास प्रथम मान्यता प्रदान करणेबाबत काही अटींच्या अधिन राहून शिफारस केलेली आहे.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांच्या तपासणी अहवालातील आणि उपसंचालक यांनी शाळा संहितेतील विविध तरतुदींच्या पुर्ततेसाठी पुढील त्रुटी दाखविल्या आहेत.
(1) मराठी शब्दकोश उपलब्ध करून घ्यावेत.
(2) प्रत्येक खोलीमध्ये अग्निशमन उपकरणे असावीत.

या त्रुटींची पुर्तता करण्याच्या उद्देशाने आपणांस कळविण्यात येते की, वरील सर्व त्रुटींची पुर्तता दिनांक 30/12/2007 पर्यंत न चुकता करावी आणि त्या त्रुटींच्या पुर्ततेचा अहवाल मंडळास शिक्षणाधिकारी [माध्यमिक] व शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत सादर करावा.

आपले लक्ष मंडळ नियमावलीतील नियम क्रमांक २८ कडे वेधण्यात येत आहे. त्यात नमूद केल्याप्रमाणे सर्व तरतुदींची पुर्तता आपल्या विद्यालयाने करणे आवश्यक आहे. ती न झाल्यास शैक्षणिक वर्ष २००७ – २००८ या एका वर्षापुरती तात्पुरती विभागीय मंडळाची प्रथम मान्यता आपल्या विद्यालयास मराठी, इंग्रजी, हिंदी, गणित-भूमिती, विज्ञान-1 व 2, इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल – अर्थशास्त्र, इ.

या विषयांना इंग्रजी/मराठी माध्यमातून सदर विषय शिकविण्यास या पत्रांद्वारे प्रदान करण्यात येत आहे.

मंडळाकडे पत्रव्यवहार करण्यासाठी आपल्या विद्यालयास तात्पुरता ____ हा सांकेतिक क्रमांक देण्यात येत आहे. तसेच आपण इयत्ता १० वीच्या विद्यार्थी संख्येप्रमाणे –
[१] १ ते ५० विद्यार्थीसाठी रु. २००/– व
[२] ५१ ते पुढील प्रत्येक ५० विद्यार्थीसाठी रु. १००/– याप्रमाणे नोंदणी शुल्क [रजिस्ट्रेशन फी] मंडळाकडे एका महिन्याच्या आत न चुकता राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावे. सदरचे नोंदणी शुल्क जमा न झाल्यास आपल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांचे मार्च २००८ च्या परीक्षेची आवेदनपत्रे मंडळास स्विकारता येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

...२...

आपणांस एका वर्षापूर्वी तात्पुरती मंडळ मान्यता प्रदान करण्यात आली. असल्याने आगामी शैक्षणिक वर्षी १५ जुलैपूर्वी आपण मान्यता वर्धित करुन घेण्यासाठी प्रस्ताव मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. मान्यता वर्धित करुन घेतल्याशिवाय आगामी परीक्षेत आपल्या विद्यालयाचे विद्यार्थी प्रविष्ठ करता येणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. तसेच प्रत्येक वर्षी १० ऑगस्ट पूर्वी मंडळाने निर्धारित केलेले नोंदणी शुल्क मंडळाकडे राष्ट्रीयकृत बँकेच्या डी.डी. ने भरणे आवश्यक आहे. मान्यता वर्धित करुन घेण्यासाठी सादर करावयाच्या प्रस्तावाचे प्रपत्र या सोबत जोडलेले आहे.

आपल्या विद्यालयाचे विद्यार्थी प्रथमच मार्च --2002----या परीक्षेत प्रविष्ठ होणार असल्याने त्यांना सर्वात जवळचे कोणते केंद्र देण्यात यावे याबाबत या प्रस्ताव आपल्या तालुका गट शिक्षणाधिकारी यांच्या व शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद --धुळे------------यांच्या शिफारशीसह या कार्यालयास त्वरित सादर करावा. अन्यथा मंडळाने दिलेल्या परीक्षा केंद्रावरच विद्यार्थ्यांना प्रविष्ठ व्हावे लागेल.

विद्यालयाच्या सोईसाठी आवेदनपत्र स्विकारणे, विक्री, प्रवेशपत्र वाटप व इतर मंडळाचे कामासाठी मंडळाने खालील प्रमाणे वितरण केंद्र निश्चित केलेले आहेत.

[१]--जो. रा. सिटी हायस्कूल, धुळे.----------------------------------
[२]-----------------------------------------------------------------
[३]-----------------------------------------------------------------

आपणांस जे वितरण केंद्र सोईचे आहे ते मंडळास कळवावे म्हणजे त्याप्रमाणे मंडळास पुढील कार्यवाही करता येईल.

Wahaske.
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
<u>नाशिक विभागीय मंडळ, नाशिक.</u>

प्रत :-

१] शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद
नाशिक/धुळे/नंदूरबार/जळगांव यांनी कृपया तपासणी अहवालातील त्रुटींच्या पुर्ततेसंबंधी कार्यपालन अहवाल प्राप्त करुन त्यांची शहानिशा करुन तो मंडळास जानेवारी अखेर पर्यंत सादर करावा. तसेच आगामी शैक्षणिक वर्षाप्रारंभी प्राधान्याने तपासणीचे काम हाती घेऊन तपासणी पूर्ण करुन तपासणी अहवाल शिक्षण उपसंचालक यांचे मार्फत या कार्यालयास पाठवावा.

२] विभागीय शिक्षण उपसंचालक नाशिक यांना माहितीस व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

-x-x-x-x-x-x-x-x-x-